सुधारणा व पुनर्वसन
**कारागृह व सुधारसेवा विभाग , महाराष्ट्र शासन**
फोन क्र. : (०२०) २६१२२५६३ फॅक्स क्र. : (०२०) २६१२५८७८
Email ID : igoffice.est1-mh@gov.in Website : https://mahaprisons.gov.in/

---

जाहिरात क्र् आस्था/विविक्षित काम/सेनि अधि/करारनियुक्ती/९७३१/२०२६/कक्ष-१ पुणे-१ दिनांक १.१०.२०२६

## जाहिरात

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाचे आस्थापनेवर न्यायविभागाशी संबंधित विविक्षिक कामकाजासाठी सेवानिवृत्त अधिकारी (राजपत्रित व अराजपत्रीत गट ब) यांची शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र सीबीई १५२५/प्र क्र ३७/आस्थामं (का १३), दिनांक १०.६.२०२५ मधील अटी शर्ती नुसार करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. त्याकरिता खालील अटी व पात्रता पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांकडून ठरावीक कालावधीकरिता करार पध्दतीने नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अक्र | कामकाजाचे स्वरुप | करार पध्दतीने सेवानिवृत्त अधिकारी यांची नियुक्ती करावयाची संख्या | मासिक पारिश्रमिक व भत्ते |
|---|---|---|---|
| १ | १) बंद्यांची न्यायालयीन प्रकरणे.<br>२) बंद्यांचे १४ वर्षीय अहवाल<br>३) बंद्यांचे संचित/अभिवचन रजा अपील प्रकरणे<br>४) मृत बंद्यांचे चौकशी अहवाल | ०२ | सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहित कार्यपध्दतीचे पालन करून करार पध्दतीने नेमणुक करताना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मुळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम हे मासिक पारिश्रमिक असेल. |

<u>सूचना</u> : याबाबतचे अर्ज महासंचालक, कारागृहे व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, सेंन्ट्रल बिल्डींग, दुसरा मजला, पुणे- ४११ ००१ येथील नोंदणी शाखा यांचेकडे **दिनांक १५.१०.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.४५ वा.) पर्यंत सादर करावेत.**

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज परिपूर्ण भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात **" कारागृह विभागातील विविक्षीत कामकाजासाठी निवड अर्ज"** असे नमूद करुन दिनांक १५.१०.२०२६ पर्यंत अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, सेंन्ट्रल बिल्डींग, दुसरा मजला, पुणे- ४११ ००१ या पत्त्यावर पोहचतील अशा बेताने पाठवावेत. दिनांक १५.१०.२०२६ रोजी सायं. ०५.४५ वा नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जदाराने अर्जामध्ये त्यांचा दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा. पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता लिहिलेले दोन लिफाफे अर्जासोबत जोडावेत. अर्जाचा नमुना <u>https://mahaprisons.gov.in/</u> या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**<u>अटी व शर्ती</u> :**

१) **वयोमर्यादा :-** करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या सेवानिवृत्त व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.

२) **नियुक्तीची कालमर्यादा-** उक्त कामकाजासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी असेल. मात्र नेमुण दिलेल्या विविक्षित कामकाजाची पूर्तता होताच किंवा विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार सक्षम नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

३) **अर्हता व अनुभव :-** कोणत्याही शाखेची पदवी उत्तीर्ण आवश्यक. कार्यकारी संवर्गातून सेवानिवृत्त झालेला आणि कारागृह विभागात न्यायविभागाशी संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक.

४) **विशेष पात्रता :-** करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

५) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागिय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

Scanned with OKEN Scanner

**इतर अटी व शर्ती :**

१) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

२) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेली नसावी.

३) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

४) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मुल्यमापन करतील.

५) सेवानिवृत्त पात्र अधिकाऱ्यांची निवड मुलाखतीव्दारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक अर्ज प्राप्तीनंतर कळविण्यात येईल.

६) मुलाखतीला येण्या-जाण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

७) करार पध्दतीने नियुक्ती देताना निवड करण्यात आलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून शासन निर्णयान्वये विहित अटी शर्ती , विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे बंधपत्र/हमीपत्र घेण्यात येईल.

(सुहास वारके)
महासंचालक
कारागृहे व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

Scanned with OKEN Scanner

## अर्जाचा नमुना

एक फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाफ्यात जोडावा

------------ कामकाजाकरिता अर्ज

**कार्यालयीन उपयोगासाठी**

१. अर्ज क्रमांक

२. अर्ज स्वीकारल्याचा दिनांक

३. अर्ज स्वीकारणा-याची स्वाक्षरी (दिनांकासहित) -----------------

**सूचना :**

१. अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजी मध्ये लिहावी. आवश्यक नसेल तेथे खोडावे.

२. अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

अ) अर्जदाराची वैयक्तीक माहिती

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : आडनांव नांव वडिलांचे/पतीचे नांव

मराठीत ---------------------------------

इंग्रजीत :

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

२. पत्रव्यवहाराचा पत्ता : -------------------------------------------------------

तालुका : --------------- जिल्हा : ------------पीन कोड : [ | | | | | ]

३. कायमचा पत्ता : -------------------------------------------------------------

तालुका : --------------- जिल्हा : ------------पीन कोड : [ | | | | | ]

४. दूरध्वनी क्रमांक : -------------------- भ्रमणध्वनी : --------------------------

५. जन्मदिनांक : [ | | | | | | | ] जन्मस्थळ : -----------------

Scanned with OKEN Scanner

६. दिनांक १.१०.२०२६ रोजीचे वय

| दि. | | म. | | व. | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

७.लिंग : पुरुष / महिला

८. धर्म ---------------------------- जात : ---------

९. सेवानिवृत्ती दिनांक

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

१०.महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? होय / नाही

ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

११. शैक्षणिक अर्हता

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव विद्यालय/ महाविद्यालय | बोर्ड/ विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १०वी) | | | | | |
| २.उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२ वी) | | | | | |
| ३.पदवी | | | | | |
| ४. पदव्युत्तर | | | | | |

१२. इतर शैक्षणिक अर्हता :

अ) संगणक प्रशिक्षित आहे काय ? होय / नाही

ब) प्रत्यक्ष कामकाजाचा किती वर्षाचा अनुभव आहे ?

१३. अर्जदाराची इतर माहिती

अ) कारागृह विभगात कोणत्या पदावर किती वर्षे सेवा केली याबाबतची माहिती –

| पदनाम | पासून | पर्यंत | कार्यालयाचे नाव | एकुण कालावधी वर्षे |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

Scanned with OKEN Scanner

ब) उमेदवाराने स्वतः हाताळलेल्या न्यायालयीन प्रकरणांचा तपशिल

| अक्र | प्रकरणाचे नांव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

१४) सेवानिवृत्ती वेतन मंजूरी आदेश (पीपीओ नं)-------------

१५) दिनांक १.१०.२०२६ रोजी घेत असलेले मुळ सेवानिवृत्ती वेतन
(अंशराशीकरण वगळुन)------------------------------------

**<u>टीप :</u>** अ.क्र.५ ते १५ मध्ये नमूद असलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत असणे आवश्यक आहे.

१६) अर्जदारावर यापूर्वी शासन सेवेत असताना विभागिय चौकशी प्रकरणी कोणती शिक्षा आहे काय?

१७) सेवानिवृत्तीच्या वेळी कोणती विभागिय चौकशी , पोलीस गुन्हा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे काय?

(क्र १६ व १७ चे उत्तर होय असेल तर अर्ज भरताना प्रकरणाचे स्वरुप व सद्यस्थिती स्पष्ट करावे.)

## <u>अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र</u>

मी, श्री/ श्रीमती . ----------------------------------------------------------
याव्दारे प्रतिज्ञापूर्व असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/ नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यस त्याची पूर्णतः जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहील. तसेच मी भरती प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण अर्जदाराची सही

दिनांक दिनांकासहीत

Scanned with OKEN Scanner